जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०२/१०/२०२३
## दि.०१/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ७९३/२०२३,भादविक ३०७,४५२ |
| **फिर्यादी** | नेत्रकुमार निषाद,वय-३७ वर्षे,रा.केसनंद फाटा,वाघोली,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपीत** | मुरली जेठुराम निषाद,वय-३३ वर्षे,रा.केसनंद फाटा,वाघोली,ता.हवेली,जि.पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०९/२०२३ रोजी ०७/३० वा.संत तुकारामनगर,केसनंद फाटा,वाघोली,ता.हवेली,जि.पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचे सहकारी तुळशीराम हे बांधकाम मजुरीचे बिगारी काम करतात. यातील नमुद इसम व त्याची पत्नी यांचेमध्ये भांडणे चालु असताना,तुळशीराम याने मध्ये पडुन त्यांची भांडणे सोडविली होती. सदर इसमाने त्याचा राग मनात धरून,तुळशीराम हा पत्र्याचे शेडमध्ये झोपलेला असताना,त्यास तु आमच्या नवरा बायकोच्या भांडणामध्ये का पडला असे बोलुन तेथे पडलेल्या रॉडने तुळशीराम यास डोक्याचे व पाठीमागील बाजुस मारून,त्यास गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विश्वजीत काइंगडे ८८८८००१२३४ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ४१४/२०२३,भादविक ३२६,३२४,५०४,५०६,आर्म ॲक्ट ४(२५),महा.पोलीस अधि. कलम ३७(१)(३)१३५ |
| **फिर्यादी** | प्रतिक गायकवाड,वय-२४ वर्षे,रा.कर्वेनगर,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ३०/०९/२०२३ रोजी रात्रौ ११/०० वा.कोळीवाडा हॉटेल समोर वारजे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा मित्र राहूल शिंदे व वैभव माने याचेसह नमुद ठिकाणी गाडी पार्क करीत असतांना,यातील नमुद इसमाने त्याचे कारचा धक्का फिर्यादी यांना दिल्याने,सदर बाबत फिर्यादी यांनी त्याला जाब विचारल्याचे कारणावरून त्याने फिर्यादीस शिवीगाळ करून त्यांना धमकी देवुन,त्यांचे पाठीवर लोखंडी धारधार हत्याराने मारहाण करून दुखापत केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. एस.ए.जाधव ८५२३६९७४५६ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ६२१/२०२३,भादविक २७९,३०४(अ),४२७,मो.वा.का.क.११९/१७७,१८४ |
| **फिर्यादी** | केच्चाप्पा जनवाड, पोलीस अंमलदार, भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| **आरोपीत** | कंटेनरवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ३०/०९/२०२३ रोजी १०/३० वा. इंडीयन ऑईल पेट्रोल पंपाचे समोरील मुंबई-बेंगलुरु हायवे रोडवर कोळेवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कंटेनर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी रस्त्याचे कडेला डावे बाजुने जाणारा मोटार सायकल चालक सदाशिव बाळाभाऊ नागवे,वय-५७ वर्षे,रा.फ्लॅट नं.२२,अमृता |

| | |
|---|---|
| | हाईट्स शारदानगर,धायरी,पुणे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मोहन देशमुख ९७६५३९०९४३ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे १००३/२०२३,भादविक ३१७ |
| **फिर्यादी** | नागेश मिस्त्री,वय-४२ वर्षे,रा.टिळेकरनगर,कोंढवा-बुद्रुक,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/१०/२०२३ रोजी सकाळी ११/०० वा.कान्हा रेसीडेन्सी,टिळेकरनगर,कोंढवा-बुद्रुक,पुणे या बिल्डींगच्या पार्कींग मध्ये |
| **तपशिल** | वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी,कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अनैत्तिक संबंधातुन किंवा संबंधातुन एक पुरूष जातीचे वय अंदाजे ९ महिन्याचे अर्भक त्याचा (मृत वा जिवंत) जन्म झाला हे लपविण्याचे व परस्पर विल्हेवाट लावण्याचे उद्देशाने,त्यास सांभाळण्यास असमर्थता दाखवुन,त्याचे पालकत्वाची जबाबदारी न स्विकारता,त्यास जन्म देवुन,उघडयावर टाकुन निघुन गेली,म्हणुन सदर अज्ञात व्यक्ती विरूध्द गुन्हा दाखल. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. पुजा पाटील ७७६७०५३९२७ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ४४९/२०२३,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ३६ वर्षे,रा.लेन नं.०६,खराडी,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०९/२०२३ रोजी सकाळी ०९/४० वा.ते दुपारी ०१/३० वा. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे राहते घरातुन त्यांचे नातेवाईक यातील नमुद इसमाने,फिर्यादी यांची नजर चुकवुन,स्वतःचे फायद्याकरीता २,३५,०००/- रुपये किचे सोन्याचे दागिने व १,९०,०००/- रुपये रोख रक्कम चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. तान्हाजी शेगर ९५५२५२९६८६ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**